नियमीत दि. दावा क्र. ३४/२०२१
बाबुलाल वि. मोरेश्वर
निशाणी क्र. ५९

**उलटतपास प्रतिवादीतर्फे विधीज्ञ श्री पी. सी. तायडे यांचे मार्फत शपथेवर सूरु –**

६. बाबूलाल तूरकर हे माझे भाऊ लागतात. रविंद्र ठाकूर व सुरेंद्र गौतम हे खुर्शीपार येथील रहीवासी आहेत. रविंद्र ठाकूर व सुरेंद्र गौतम हे खरेदी विक्री सोसायटी खुर्शीपार येथील सदस्य नाहीत. हे म्हणणे खरे आहे की, सन २०१७ मध्ये खुर्शीपार येथील बऱ्याच शेतकऱ्यांना कर्जमाफी मिळाली होती. हे म्हणणे खरे नाही की, कर्जमाफी मिळालेल्या शेतकऱ्यांमध्ये रविंद्र ठाकूर व सुरेंद्र गौतम हे देखील होते. वादी हा सन २०२० मध्ये विविध सेवा सहकारी सोसायटी खुर्शीपार चे अध्यक्ष होते. हे म्हणणे खरे नाही की, अध्यक्ष हे कर्जमाफीची यादी तयार करतात व वर मंजूरीला पाठवितात. हे म्हणणे खरे आहे की, सन २०२० चे कर्जमाफी यादीमध्ये प्रतिवादी याचे नाव होते व त्यांना कर्जमाफी मिळाली होती. त्यावेळी वादी व प्रतिवादी यांच्यामध्ये कर्जमाफी बाबत वाद झाले होते किंवा नाही हे मला माहीती नाही. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी याचे असे म्हणणे होते की, वादी हा त्याच्याकडे रक्कम रुपये ६५,०००/– मागणी करत होता. हे म्हणणे खरे आहे की, त्यावेळी प्रतिवादी याने जिल्हा निबंधक कार्यालय गोंदिया यांचेकडे वादीचे विरुध्द तक्रार दिली होती. रविंद्र ठाकूर व सुरेंद्र गौतम यांनी देखील जिल्हा निबंधक कार्यालय गोंदिया येथे वादीचे विरुध्द तक्रार दिली होती किंवा कसे हे मला माहीती नाही.

७. प्रतिवादी हा पुर्णपणे दृष्टीहीन नाही. वादी हा प्रतिवादी याला भोकऱ्या असे म्हणाल्याने प्रतिवादी याने दिनांक ०६/०७/२०२० रोजी वादीचे विरुध्द पोलीस ठाण्यात तक्रार दिली होती किंवा कसे याबाबत मला माहीती नाही. हे म्हणणे खरे आहे की, वादीचे विरुध्द गुन्हा नोंद झाला व ती केस न्यायालयात सुरू आहे.

८. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी याची पत्नी सन २०१२ ते २०१७ मध्ये खुर्शीपार येथील सरपंच होती. प्रतिवादी याची पत्नी सन २००७ ते १२ या कालावधीत सदस्य म्हणून होती. हे म्हणणे खरे नाही की, त्या कालावधीमध्ये देखील वादी व प्रतिवादी यांच्यामध्ये वाद झाले होते. वादी व प्रतिवादी यांचेमध्ये पुर्वीपासून वाद आहेत किंवा कसे

याबाबत मला माहीती नाही. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक ०२/०८/२०२० रोजी व दिनांक ०९/०८/२०२० रोजी प्रतिवादी हा गावात येवून ओरडू लागला व वादीला शिवीगाळ करून त्याची बदनामी करू लागला असे माझ्या समक्ष काहीही घडलेले नाही. दिनांक ०२/०८/२०२० व दिनांक ०९/०८/२०२० रोजीच्या घटनेबाबत मला पोलीस ठाण्यात बोलवले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, मी पुराव्याचे खोटे शपथपत्र दाखल केले आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी सांगतो त्याप्रमाणे वादीची कोणतीही बदनामी झाली नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी आज रोजी न्यायालयात खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**
**फेरतपास नाही.**

**श्रवणोत्तर स्विकृत**

**स्वा/-**
**(समीर गोपाळ गुणारी)**
**दिनांक : ०६/०२/२०२६.** **दिवाणी न्यायाधिश क.स्तर, आमगांव**